माहितीचा अधिकार

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर
लेखा कोष भवन, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय जवळ, छत्रपती संभाजीनगर – ४३१००१
ईमेल: jdaurangabad-mahalfa@mah.gov.in website: www.mahalfa.maharashtra.gov.in दुरध्वनी क्रमांक: ०२४०-२९५०११६

जा.क्र.स्था-१८/ब/छत्रपती संभाजीनगर/सहसंचालक/प्रशासन/481(अ)/२०२४ दिनांक : 20.06.2024

**संदर्भ :- मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांचे पत्र क्र.स्था १८/ब/आस्था-७/कंत्राटी वाहनचालक/मंजूरी/ न.क्र.८५१/ ६४१ दिनांक .१६/०५/२०२४.**

## जाहिर दरपत्रक सुचना

सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयास वाहन उपलब्ध होणार आहे. त्यानुषंगाने वाहन उपलब्ध झाल्यास सदरील वाहनांसाठी वरील संदर्भिय पत्रान्वये कंत्राटी तत्वावर वाहनचालकाची १२ महिन्यासाठी दिनांक **०१.०८.२०२४ ते ३१.०७.२०२५** या कालावधीसाठी नेमणूक करावयाची आहे. त्यानुषंगाने परवानाधारक संस्थेकडून मोहरबंद लिफाप्यात दरपत्रक (कोटेशन) दिनांक २१.०६.२०२४ पासून ते दिनांक २७.०६.२०२४ पर्यंत मागविण्यात येत आहेत. सदरचे दरपत्रक स्वतःचे लेटर पॅडवर बंद पाकिटातून दिनांक २७.०६.२०२४ रोजी सायकांळी ४.०० वाजेपर्यंत प्रस्तूत कार्यालयाच्या आवक जावक विभागात सादर करावीत. यासंबधीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **मुळ वेतन** | **विशेष भत्ता** | **कामगार कायदयातील तरतूदीनुसार भरावयाची रक्कम** | **प्रशासकीय खर्च** | **वस्तू व सेवाकर** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |

**अटी-शर्ती**

१. प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी संबंधित उमेदवारास जारी केलेले एच.एम.व्ही./एल.एम.व्ही. वाहन चालविण्याची मुळ अनुज्ञप्तीपत्र / परवाना (Driving License).
२. उमेदवार वाहन चालविण्यासाठी मानसिक / शारिरीक दृष्टया पात्र असल्याबाबत सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र.
३. उमेदवारास L.M.V. वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असल्याचे संस्थेंचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. (खाजगी व्यक्तिकडे काम केल्याचे प्रमाणपत्र चालणार नाही.)
४. उमेदवार किमान दहावी उत्तीर्ण असावा.
५. दिनांक ०१.०६.२०२४ रोजी उमेदवाराचे वय हे ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे व २१ वर्षापेक्षा कमी नसावे.
६. उमेदवारास मराठी व हिंदी भाषा अवगत असावी.
७. उमेदवार वाहनचालक निर्व्यसनी असावा.
८. उमेदवारास वाहन दुरूस्तीची प्राथमिक माहिती असावी.
९. वाहनचालकाचा प्रत्येक दिवसाचा कामकाजाचा कालावधी नऊ तास राहील. मात्र आवश्यक्तेनुसार त्यात वाढ होवू शकते

१०. कंत्राटी वाहनचालकाचे कार्यक्षेत्र हे छत्रपती संभाजीनगर विभागाचे भौगोलिक क्षेत्र असेल त्यामुळे वाहनचालकास छत्रपती संभाजीनगर विभागाचे भौगोलिक ज्ञान असणे आवश्यक राहील. शासकीय कामानिमित्त आवश्यकता भासल्यास विभागाबाहेरील क्षेत्रात वाहन चालवावे लागेल.

११. आवश्यकता भासल्यास सुटटीच्या दिवशीही कामावर बोलाविण्याचा अधिकार सहायक संचालक, प्रस्तूत कार्यालय यांचा राहिल.

१२. बाहययंत्रणेव्दारे कंत्राटी वाहनचालकांची सेवा दिनांक ०१.०८.२०२४ ते ३१.०७.२०२५ (१२ महिने) या कालावधीची असेल.

१३. वाहनचालकाचा प्रत्येक दिवसाचा कामकाजाचा कालावधी ९ तास राहील. याव्यतिरिक्त पुढे काम झाल्यानतंर शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०९.०९.२०११ अन्वये निर्धारित केलेल्या दराप्रमाणे अतिकालीक भत्ता लागु राहील.

१४. कंत्राटी वाहनचालकांना अदा करण्यात येणारे मानधनाची रक्कम आपणास उपलब्ध असलेल्या अनुदानातून अदा करण्यात येईल. त्यामुळे सदर रक्कम प्रत्येक महिन्याला न करता २ टप्प्यात करण्यात येईल.

१५. मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, मुंबई यांचेकडून सदरील खर्चाकरीता अनुदान उपलब्ध झाल्यावरच देयकाचे शोधन केले जाईल.

१६. मुदतीत प्राप्त झालेले सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा कोणतही कारण न देता नाकारणेचा अधिकार मा. सहसंचालक यांना राहिल.

१७. वरील अटीचे पालन जी संस्था करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अप्राप्त ठरविण्यात येईल.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २७.०६.२०२४ रोजी सायकांळी ५.०० वाजता मा. सहसंचालक यांच्या दालनात या कार्यालयाची खरेदी समिती व संस्थेचे उपस्थित प्रतिनिधी यांच्या समक्ष उघडण्यात येईल. या कार्यालयाने MAHASWAYAM या प्रणालीवर जाहिरात दिली असून सदर प्रणालीवर सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणारे उमेदवार उपलब्ध झाल्यास Offline प्राप्त झालेले दरपत्रके रदद करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**स्थळ :- छत्रपती संभाजीनगर.**
**दिनांक :- २०.०६.२०२४.**

— सही —

**( दिपाराणी देवतराज )**
**सहसंचालक,**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा, छत्रपती संभाजीनगर विभाग,छत्रपती संभाजीनगर**

प्रत:- १. सहायक संचालक,संगणक,संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा,महाराष्ट्र राज्य मुंबई यांना देवुन विनंती करण्यात येते कि, सदरील दरपत्रकास आपले वेबसाईटवर प्रसिध्दी देण्यात यावी.
२. कार्यालयाचे नोटीस बोर्ड.

**( दिपाराणी देवतराज )**
**सहसंचालक,**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा, छत्रपती संभाजीनगर विभाग,छत्रपती संभाजीनगर**